# ३. सुहंकरं विज्जागहणं

'उत्तरज्झयणसुत्तं' हे जैन आगमातील महत्त्वाचे मूलसूत्र आहे. यावर आचार्य नेमिचंद्रसूरी (देवेन्द्रगणी) यांनी इ.स. १०७३ मध्ये 'सुखबोधा' नावाची टीका संस्कृतमध्ये लिहिली. त्यांनी श्लोकांच्या स्पष्टीकरणाकरिता महाराष्ट्री प्राकृत भाषेत सविस्तर कथा लिहिल्या आहेत, हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. या कथेत एक सिद्‌ध पुरुष दयाळूपणाने गरीब पुरुषास मंतरलेला घडा देतो. तो गरीब मनुष्य त्या घड्याच्या सहाय्याने विविध सुखे भोगतो. एकदा दारूच्या धुंदीत प्रमादामुळे त्या पुरुषाचा घडा फुटतो. याप्रमाणे त्याचे सर्व वैभव नष्ट होते. त्याने जर ती मंत्रविद्या शिकून घेतली असती, तर त्याला नवीन घडा निर्माण करता आला असता व दुसऱ्यांची नोकरी करावी लागली नसती. या कथेत हे सांगितले आहे, की स्वतः ज्ञान प्राप्त करावे. त्यामुळे प्रत्येकाला आपले जीवन स्वबळावर सुखी करता येते.

एको गोहो अभग्गसेहरो अईव-दोगच्चेण बाहिओ। किसि-कम्माइं करेंतस्स वि तस्स ण किंचि फलइ। तओ वेरग्गेण णिग्गओ गेहाओ, लग्गो पुहइं हिंडिउं।



कुणइ अणेग धणोवज्जणोवाए, परं ण किंचि संपज्जइ। तओ सो णिरत्थअपरिब्भमणेणं णिव्विण्णो पुणरवि जओ पडिणियत्तो। एगम्मि गामे देवालए रत्तिं वासोवगओ।

तओ देवालयाओ एओ पुरिसो णिग्गओ चित्त-घड-हत्थ-गओ। सो एग-पासे ठाइऊण तं चित्तघडं पूइऊण भणइ, ''लहुं मे परम-रमणिज्जं वासहरं सज्जेहि।'' तेण तक्खणमेव कअं। एवं सयण-आसण-धण-धण्ण-परियणभोगसाहणाइं कारिओ। एवं जं जं भणइ तं तं करेइ चित्त-घडो जाव पहाए पडिसारइ।

तेण गोहेण सो दिट्ठो। पच्छा सो चिंतेइ, किं मज्झ बहुएण परिभमणेण? एयं चेव ओलग्गामि। तस्संतियं गंतूण तेण भण्णइ, 'अहं मंद-भग्गो, दोगच्चेण कयत्थिओ, तुम्ह सरणमागओ। ता तुम्ह पसाएण अहं एवं चेव भोगे भुंजामि।' सिद्ध-पुरिसेण चिंतिअं, 'अहो! एस वराओ अईव दारिद्द-दुहक्कंतो। दुहियाण वच्छला हवंति महा-पुरिसा। अण्णं च

संपत्तिं पावेउं काअव्वो सव्व-सत्त-उवआरो।  
अत्तोवआललिच्छू उयरं पुरेइ कस्स वि।।  
ता करेमि इमस्स उवआरं' ति।

तओ तेण भण्णइ, 'किं विज्जं देमि उयाहु विज्जाभिमंतियं घडयं?' तेण विज्जा-साहण-पुरच्चरण-भीरुणा मंद-बुद्धिणा भोग-तिसिएण भणिअं, 'विज्जाहिमंतियं घडं देहि'। तेण दिण्णो। सो तं गहाय हट्ठ-तुट्ठ-मणो गओ सगामं। चिंतियं च अणेण,

'किं तीए सिरीए पीवराए जा होइ अण्ण-देसम्मि।  
जा अ ण मित्तेहिं समं जं चामित्ता ण पेच्छंति।।'

तत्थ बंधूहिं मित्तेहिं अ समं जहाभिरुइयं भवणं विउव्विऊण भोगे भुंजंतो अच्छइ।

सो कालंतरेण अइ-तोसेण घडं खंधे काऊण 'एयस्स पभावेण अहं बंधु-मज्झे पमोयामि' त्ति भणिऊण आसव-पीओ पणच्चिओ। तस्स पमाएण सो घडो भग्गो। सो विज्जा-कओ उवभोगो णट्ठो। पच्छा सो पलईभूअ-विहवो पर-पेसणाईहिं दुक्खाणि अणुहवइ। जइ पुण सा



विज्जा गहिया हुंता, तओ
भग्गे वि घडे पुणो करेंतो।

## शब्दार्थ

**गोहो –** (दे.) पुरुष
**सेहर –** शेखर, तुरा
**बाहिओ –** त्रस्त झाला
**वेरग्गेण –** कंटाळून
**अणेण –** त्याने
**ण किंचि संपज्जइ –** काहीच / थोडेही मिळविले नाही
**रत्तिं –** रात्री
**चित्त–घड–हत्थ–गओ –** चित्रित / रंगवलेला घडा हातात घेतलेला
**लहुं –** लवकर, लगेच
**वासहर –** निवासगृह
**तक्खणमेव –** (तक्खणं + एव) तत्क्षणी
**सयणासण –** सयण + आसण, शय्या म्हणजे अंथरुण व आसन
**ओलग्गामि –** नोकरी किंवा सेवा करतो
**मंद–भग्गो –** मंदभाग्य, कमनशिबी
**पसाएण –** प्रसादाने, कृपेने
**दारिद्द–दुहक्कंतो –** दारिद्द + दुह + अक्कंतो – गरीबीने गांजलेला
**वच्छला –** प्रेमळ, वत्सल
**अत्तोवआललिच्छू** (दे.)– स्वार्थलोलुप
**अभग्ग –** कमनशिबी
**दोगच्चेण –** दुर्दैवाने
**किसिकम्माइं –** शेतीची कामे
**हिंडिउं लग्गो–** (कृदंत) हिंडू लागला, फिरू लागला
**धणोवज्जणोवाए –** पैसे मिळवण्याचा उपाय
**णिव्विणो –** दुःखी
**वासोवगओ –** वास + उवगओ – निवास केला
**पूइऊण –** (कृदंत) पूजा करून
**परम–रमणिज्ज –** अत्यंत सुंदर
**सज्जेहि –** तयार कर, निर्माण कर (आज्ञार्थ)
**साहणाइं –** साधने
**तस्संतिय –** तस्सं + अंतियं = त्याच्याजवळ
**कयत्थिओ –** त्रासलेला
**वराओ –** (दे.) बिचारा, बापडा
**सव्व–सत्त–उवयारो –** सर्व प्राण्यांवर उपकार करणारा
**कस्स वि –** कोणाचीही
**विज्जाभिमंतियं घडं –** विद्येने मंतरलेला घडा
**उयाहु –** (अव्यय) अथवा
**हट्ठ–तुट्ठ–मणो –** आनंदित, संतुष्ट मनाचा/ने

**पुरच्चरण** – पुरश्चरण, सराव

**सिरीए** – लक्ष्मीचा, संपत्तीचा

**चामित्ता** – च + अमित्ता – आणि शत्रू

**जहाभिरुइयं** – जहा + अभिरुइयं – आपल्या आवडीप्रमाणे, यथेच्छ

**विउव्विऊण** – (कृदंत) दिव्य सामर्थ्याने निर्माण करून

**पमाएण** – निष्काळजीपणा

**पीवराए** – विपुल

**पणच्चिओ** – जोराने नाचू लागला

**णट्ठो** – नष्ट झाला, फुटला

**पलईभूअ** – नष्ट झालेले

**परपेसणाईहिं** – दुसऱ्यांची चाकरी करून

**आसव–पीओ** – दारू प्यायलेला (तो)

**विज्जा–कओ** – विद्येने मंतरलेला

## सज्झाओ

**१ पाठातून योग्य शब्द निवडून वाक्य पूर्ण करा.**

१) गोहो ........ बाहिओ।

२) पुरिसो चित्तघडं पूइऊण ........ भणइ।

३) महापुरिसा ........ वच्छला हवंति।

४) तस्स घडो ........ भग्गो।

५) गोहो ........ दुक्खाणि अणुहवइ।

**२ थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) पुरुषाच्या वाट्याला येणाऱ्या दुर्दैवाची कारणे लिहा.

२) देवालयातील अभिमंत्रित घड्याचे वैशिष्ट्य सांगा.

३) विद्याग्रहणाचे महत्त्व स्पष्ट करा.

४) ''पश्चात्तापाची वेळ येऊ नये'' हे विधान सिद्ध करा.

**३ खालील वाक्यातील हेतू स्पष्ट करा.**

१) किं मज्झ बहुएण परिभमिएण?

२) 'अहो! एस वराओ अईव दारिद्द–दुहक्कंतो।'

३) 'विज्जाहिमंतियं घडं देहि।

४) 'जइ पुण सा विज्जा गहिया हुंता, तओ भग्गे वि घडे पुणो करेंतो'।

**४ व्याकरण :**

**अ) खालील कोष्टक पूर्ण करा.**

| अनु. | शब्द | लिंग | वचन | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | देवालयाओ | | | |
| २. | पसाएण | | | |
| ३. | एयस्स | | | |

**ब) रूपे ओळखा :**

किसि–कम्माइं, गामे, देवालयाओ, वासहरं, दिट्ठो, पुरिसेण, चिंतेइ, भणिऊण, पमोयामि, मंद–बुद्धिणा

**५ संधी सोडवा :**

अ) वासोवगओ, तक्खणमेव, सरणमागओ, विज्जाहिमंतियं, सयणासण

**ब) संधी करा :**

तस्स + अंतियं, धण + उवज्जण + उवाए, दुह + अक्कंतो, जहा + अभिरुइयं, काल + अंतरेण

**क) या पाठातील क्रियापदांचा अर्थासहित संग्रह करा.**

❋❋❋